## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 : महायुती व महाविकास आघाडी यांच्या जाहीरनाम्याचा तुलनात्मक अभ्यास

इनामदार ऋषिकेश किरण सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्रीमती. मीनलबेन महेता महाविद्यालय, पाचगणी

---

**गोषवारा:**

सरकार आणि शास्तीत यांच्यातील मध्यस्थ म्हणून राजकीय पक्ष हे आधुनिक लोकशाहीमध्ये आपली भूमिका बजावताना पाहायला मिळतात. आधुनिक लोकशाहीमध्ये नागरिकांचे प्रतिनिधित्व करण्याची मुख्य जबाबदारी ही राजकीय पक्षांवर असलेली पाहायला मिळते. राजकीय पक्ष हे वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करून नागरिकांशी संवाद साधत असतात. जसे की प्रचार सभा, मेळावे, संमेलने, राजकीय जाहिराती इ. या माध्यमातून राजकीय पक्ष हे नागरिकांना त्यांच्या ध्येय-धोरणांबद्दल, आश्वासनांबद्दल शिक्षित करत असतात व त्यातून सत्तेत येण्याचा प्रयत्न करतात. या सर्व प्रक्रियेत राजकीय पक्षांसाठी निवडणूक जाहीरनामे हे महत्त्वाचे साधन म्हणून कार्य करत असते. म्हणून, जाहीरनामे हे निवडणूक लोकशाहीसाठी एक आधारस्तंभ मानले जाऊ शकतात.

राजकीय पक्षांचे जाहीरनामे हे पक्षांच्या भूमिकेबद्दल स्पष्टता प्रदान करतात. तसेच उमेदवारांना राजकीय पक्षांचे दृष्टिकोन मतदारांपर्यंत पोहोचवण्यास मदत करतात. राजकीय जाहीरनाम हे प्रचारक म्हणून देखील मार्गदर्शक ठरतात. राजकीय पक्षांच्या उमेदवारांना पक्षीय रेषेशी जुळवून घेण्यासाठी जाहीरनामे सुलभ ठरतात.तसेच पक्षांच्या भूमिके मधील बदलांचे संकेत देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य देखील राजकीय पक्षांचे जाहीरनामे करत असतात. कधीकधी जाहीरनाम्यानमध्ये जनतेला आश्वासनांसह कामगिरीची तुलना करण्याची पुरेशी माहिती राजकीय पक्षांकडून प्रदान केल्यामुळे राजकीय जाहीरनामे हे राजकीय पक्षांसाठी जबाबदारी ठरतात*(Ashworth,2000)*.नुकत्याच महाराष्ट्रात घडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत दोन्ही महत्त्वाच्या आघाड्यांनी आपापले जाहीरनामे प्रसिद्ध केलेले होते. या जाहीरनाम्यांचा तुलनात्मक अभ्यास हा एकूणच महाराष्ट्र राज्यातील राजकारणाचा परिघ समजून घेण्यास मदत करतो. महायुती व महाविकास आघाडी या दोन्हीही आघाड्यांच्या जाहीरनाम्यांचा तुलनात्मक अभ्यास हा महाराष्ट्रातील समाजकारण, अर्थकारण, राजकारण, धर्मकारण आणि एकूणच राजकारणाचे पर्यावरण यामध्ये चालू असणाऱ्या वेगवेगळ्या प्रक्रिया त्यांचे एकमेकांशी असलेले नातेसंबंध व त्यातून तयार होणाऱ्या महाराष्ट्रातील जटिल गुंतागुंत जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**Key words :** जाहीरनामा, महायुती, महाविकास आघाडी, कायदा आणि सुव्यवस्था, कृषी, शिक्षण, सामाजिक न्याय.

**प्रस्तावना:**

जाहीरनामे म्हणजे राजकीय दृष्ट्या सुसंस्कृत पक्षांच्या उच्चभ्रूंनी वेगवेगळी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून लिहिलेला धोरणात्मक दस्तऐवज होय. म्हणूनच धोरण ठरविण्याच्या विविध मुद्द्यांवर, जनतेच्या समस्यांवर आणि सत्तेत आल्यास राष्ट्राच्या विकासासाठी पक्षाचा दीर्घकालीन अजेंडा इ. पक्षाची अधिकृत भूमिका समजून घेण्यासाठी राजकीय पक्षांचे जाहीरनामे महत्त्वाचे ठरतात. मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी आणि इतर पर्यायांपासून दूर ठेवण्यासाठी जाहीरनामे महत्त्वाचे दस्तऐवज ठरतात. जाहीरनाम्यानमधील आश्वासने ही राजकीय पक्षांसाठी बंधनकारक नसली तरी जाहीरनाम यांच्या माध्यमातून राजकीय पक्ष हे ओळख आणि प्रतिमा निर्माण करून मतदारांसाठीचे प्राधान्यक्रम ठरवण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यान मधून त्या पक्षांच्या राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या मुद्द्यांवरील पक्षाची विचारसरणी, भूमिका तसेच समकालीन घटना, परिस्थिती यांवरील पक्षांच्या भूमिका स्पष्ट होत असतात . राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यान मधून पक्षांची निवडणूक लढवण्याची रणनीती देखील लक्षात येत असते. राजकीय जाहीरनाम्यामध्ये कोणत्या मुद्द्याला, प्रश्नाला , समस्येला किती महत्त्व दिले गेले आहे यावरून त्या त्या पक्षांचे प्राधान्यक्रम दिसून येत असतात.

भारतीय निवडणूक आयोगाच्या आचारसंहीते (२०१९) मध्ये जाहीरनामा म्हणजे एक प्रकाशित दस्तऐवज ज्यामध्ये राजकीय पक्षांची विचारधारा हेतू विचार ध्येयधोरणे आणि कार्यक्रमांची माहिती दिलेली असते अशी व्याख्या करण्यात आलेली आहे. राजकीय पक्षांना त्यांच्या जाहीरनाम्यातील आश्वासने पूर्ण करण्यास कायदेशीररित्या बांधील राहता येत नाही. भारतात, २०१५ मध्ये या प्रकरणावरील एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती, ज्यामध्ये असे म्हटले होते की, सध्याच्या कायदेशीर चौकटी जाहीरनाम्यातील आश्वासने मोडणाऱ्या राजकीय पक्षांना जबाबदार धरता येत नाही. निवडणूक आयोगाने २०१३ मध्ये आदर्श आचारसंहितेच्या 'जाहिरनामा' विभागात, सर्वोच्च न्यायालयाच्या दुसऱ्या प्रकरणात दिलेल्या निर्देशांमुळे, व्यापक मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. तथापि, ही मार्गदर्शक तत्त्वे जबाबदारी स्थापित करण्यावर लक्ष केंद्रित करत नाहीत, तर दिलेल्या आश्वासनांच्या स्वरूपावर लक्ष केंद्रित करतात.

भारतात, स्वातंत्र्यापूर्वीपासून राजकीय पक्ष निवडणूक जाहीरनामे जारी करत आहेत. उदाहरणार्थ, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रांतीय निवडणूक जाहीरनाम्यांचा वापर स्वातंत्र्यसेनानी आणि उत्तर प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष दामोदर सेठ यांनी १९४६ मध्ये उत्पादन, दळणवळण, कर्ज आणि देवाणघेवाण आणि खनिज संसाधनांच्या महत्त्वाच्या साधनांवर सार्वजनिक मालकीचा युक्तिवाद करण्यासाठी केला होता. संविधान सभेच्या चर्चेदरम्यान, विशेषतः नोव्हेंबर आणि डिसेंबर १९४८ मधील अधिवेशनांमध्येही हेच जाहीरनाम्यांचा वापर करण्यात आला होता. एक प्रमुख भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि संसद सदस्य महावीर त्यागी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यांमध्ये अशा वचनबद्धतेचा उल्लेख करून दारूबंदीचा युक्तिवाद केला.

राजकीय पक्षांचे जाहीरनामे यांचे प्रकाशन ही भारतातील एक वैधानिक आवश्यकता समजली जाते. राजकीय पक्षांच्या वैचारिक आणि धोरणात्मक भूमिकांबद्दल जाहीरनामे दृष्टिकोन प्रदान करत असतात. राजकीय पक्षांचा आवाज म्हणून व जाहीरनाम्यांनकडे पाहिले जाते.जाहीरनामे केवळ सुज्ञ मतदारांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि पत्रकारांना माहिती देण्यासाठी पक्षांच्या भूमिकांचे एक संच म्हणून काम करत नाहीत तर त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे पक्षांच्या उमेदवारांसाठी आणि कार्यकर्त्यांना संघटित करण्यासाठी एक मार्गदर्शक पुस्तिका म्हणून देखील काम करतात. राजकीय पक्षांचे जाहीरनामे हे नागरिकांसाठी पक्षातंर्गत गटबाजीच्या काळात राजकीय पक्षाची अधिकृत भूमिका म्हणून काम करत असतात. या शोधनिबंधातून नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील प्रमुख आघाड्यांच्या जाहीरनाम्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा केलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. प्रस्तुत शोधनिबंधातून महाराष्ट्रात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील प्रमुख आघाड्यांच्या जाहीरनाम्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. कायदा व सुव्यवस्था, कृषी, शिक्षण आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांच्या आधारे महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या भूमिका ध्येय-धोरणे, विचारधारा इ. आढावा घेणे.

३. जाहीरनाम्यांचे निवडणुकीतील स्थान, भूमिका, महत्त्व, मतदारांवर होणारा परिणाम व राजकीय पक्ष व जाहीरनामे यांच्यातील नातेसंबंध तपासून पाहणे.

**संशोधन पद्धत आणि तथ्य संकलन :** प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना गुणात्मक पद्धतीचा व प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमिक साधनांमध्ये पक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेले त्यांचे जाहीरनामे , तसेच प्रसार माध्यमांच्या द्वारे प्रसिद्ध करण्यात आलेले विविध लेख व दुय्यम साधनांमध्ये संदर्भ ग्रंथ लेख अहवाल इत्यादीचा वापर करण्यात आलेला आहे.

**महायुती :**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या जाहीरनाम्याची सुरुवात ही 25 ठळक मुद्द्यांपासून होते. त्यामध्ये लाडकी बहीण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा , वृद्ध पेन्शन स्कीम , महागाई नियंत्रण, रोजगार निर्मिती, ग्रामीण भागातील रस्ते निर्मिती , विज बिल सवलत , व्हिजन महाराष्ट्र २०२९ , एक ट्रिलियन अर्थव्यवस्था , AI विद्यापीठ , कौशल्य जनगणना, छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र, स्वामी विवेकानंद युवा आरोग्य कार्ड, गडकिल्ले विकास प्राधिकरण इ. प्रमुख मुद्द्यांचा समावेश झालेला पाहायला मिळतो.

**महाविकास आघाडी :**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या इंडिया अलायन्सच्या जाहीरनाम्याची सुरुवात ही healthy Maharashtra, entrepreneur Maharashtra , biodiversity rich Maharashtra, inclusive Maharashtra , vibrant and urban Maharashtra या ठळक विशेषणांनी झालेली आहे. महिलांसाठी तीन हजार रुपये देणारी महालक्ष्मी योजना, फ्री बस सेवा, निर्भय महाराष्ट्र, सर्वाइकल कॅन्सर साठीचे फ्री लसीकरण, मासिक पाळी मधील दोन दिवसांची रजा, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, शेतकऱ्यांच्या मालासाठी एमएसपी , बेरोजगार तरुणांसाठी 4000 रुपयाचा मासिक भत्ता, सरकारी सेवकांची भरती, युथ कमिशनची स्थापना , महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे संपूर्ण वर्षभराचा आराखडा , विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट कार्ड योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, नवीन औद्योगिक धोरण, जाती आधारित जनगणना , विज बिला मध्ये सवलत, जुनी पेन्शन योजना लागू करण्याची तरतूद, शिव भोजन थाळी योजना, ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुका वेळेत घेण्यासाठी तरतूद, मिशन महाराष्ट्र २०३० इ. मुख्य मुद्द्यांचा समावेश पाहायला मिळतो.

**कायदा आणि सुव्यवस्था :**

महायुतीच्या जाहीरनाम्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था या मुद्द्याखाली बळजबरीने धर्मांतर करणाऱ्या विरोधात कठोर कायदा लागू करण्याबरोबरच बेकायदेशीर बांगलादेशी व रोहिंग्या पुष्कर यांना परत पाठवण्याची तरतूद करण्यात येईल असे सांगितले आहे. पोलीस विभागातील रिक्त जागा भरण्यासाठी महापोलीस भरती मोहीम सुरू करण्यात येईल, नागरी आणि ग्रामीण विकास क्षेत्रात Geospatial टेक्नॉलॉजी चा उपयोग करून नगररचना अधिक काटेकोरपणे आखल्या जातील, स्थानिक स्वराज्य संस्थांना मजबूत करण्यासाठी या संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यासाठी उत्तमराव पाटील प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात येईल इ . गोष्टींचा परामर्श यामध्ये केलेला आहे. तर महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था यामध्ये ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकल सदस्य प्रभाग पद्धतीनुसार त्वरित घेण्यात येतील, महिला अत्याचारांविरोधातील गुन्ह्यासंबंधी त्वरित न्यायाचे धोरण आखण्यात येईल, पोलीस भरती प्रक्रिया सुरळीत करून 50 हजार नवीन पदे निर्माण करण्यात येतील, पोलीस यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यासाठी राम प्रधान कमिटीच्या शिफारसी लागू करण्यात येतील, महाराष्ट्रामध्ये फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटी ची स्थापना करण्यात येईल, धार्मिक द्वेष निर्माण करणारी विधाने करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाईसाठी धोरण आखण्यात येईल, मॉब लिंचिंग विरोधात कडक धोरणे राबवण्यात येतील इ. मुद्द्यांवर भर यामध्ये दिलेला आहे.

**कृषी व संलग्न क्षेत्रांचा विकास :**

शेतकऱ्यांना कर्जमाफी त्यासोबतच एम एस पी शी समन्वय साधत 20 टक्क्यांपर्यंत भावांतर योजना राबवण्यात येईल, जलयुक्त शिवार अभियान ३.० , मराठवाडा वॉटर गिड प्रकल्प, प्रत्येक गाव स्तरावर पाण्याचा ताळेबंद, डॉ. पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती मिशन, कृषी तंत्रज्ञान स्टार्टअप बनवण्यासाठी विभागनिहाय क्लस्टर , सौर पॅनल अच्छादित शेती हा उपक्रम , मका व बांबू आधारित इथेनॉल केंद्र, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील राज्य वस्तू व सेवा कर अनुदानाच्या स्वरूपात शेतकऱ्यांना परत देण्यात येईल, कापूस ते कापड ही योजना, कांद्याला रस्त भाव देण्यासाठी कांदा पोर्टल सुरू करण्यात येईल, यांत्रिक कृषी मिशन सुरू करण्यात येईल, शेतकरी उत्पादक संघटना यासाठी व्यापक कार्यक्रम राबवण्यात येईल, कृषी प्रक्रिया उद्योग धंदे वाढवण्यासाठी चालना देण्यात येईल, महाराष्ट्र मत्स्य मिशन , गोवर्धन - गोवंश सेवा केंद्र इ. बाबींची पूर्तता करण्यासाठी महायुती सरकार प्रयत्न करेल. तर महाविकासाआघाडी सत्तेत आल्यास तीन लाखापर्यंतची कर्जमाफी, शेतकरी आत्महत्यांमुळे प्रभावित झालेल्या कुटुंबांमधील विधवा महिला आणि मुलांना आधार देण्यासाठी योजना राबवली जाईल, शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत मिळण्यासाठी सरकार वचनबद्ध राहील, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार करून दरवर्षी दुधाचे दर निश्चित करण्यात येतील, शेतकऱ्यांना शेतीमध्ये प्रवेश करण्यासाठी कायमस्वरूपी खडीचे रस्ते विकसित करण्यात येतील, पर्यायी रोजगाराच्या संधी निर्माण करून शेतीवर अवलंबून असलेले संख्या कमी करण्यात येईल, महाराष्ट्र बाजरी अभियान, कांदा व टोमॅटो पिकासाठी गुलाबी व केशरी क्रांती करण्यात येईल, दुष्काळ निर्मूलन आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाई यासाठी एक ठोस कृती कार्यक्रम राबवण्यात येईल, शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन हवामान बदलास सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल, शेतकरी कर्जमाफीसाठी गोरवाला समितीच्या शिफारसी लागू करण्यात येतील, कोकम फणस केळी नारळ सुपारी आणि जांभूळ यांसारख्या फळांसाठी पीक विमा योजना सुरू करण्यात येईल, कोकणात फळ प्रक्रिया आणि विदर्भात संत्रा प्रक्रिया केंद्रे उघडण्यात येतील, शेती व संलग्न क्षेत्रावरील जीएसटी रद्द करण्यात येईल, ज्योतीराव बर्वे मत्स्यपालन विकास महामंडळाची स्थापना, प्रत्येक जिल्ह्यात मासे उत्पादन विपणन समित्या स्थापन करण्यात येतील, सागरी जीवसृष्टीचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र मत्स्यपालन कायदा मंजूर करण्यात येईल, महिला शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्यात येईल, विदर्भ मराठवाडा उत्तर महाराष्ट्र आणि कोकण प्रदेशातील सिंचनाच्या अनुशेष भरून काढण्यासाठी तरतूद करण्यात येईल, सिंचन व्यवस्थापन प्रणालीचे संगणकीकरण करण्यात येईल, भूजल व्यवस्थापन भूजल पुनर्भरण आणि भूजल वापरासाठी सार्वजनिक धोरण आखण्यात येईल इ. बाबींचा उल्लेख कृषी क्षेत्राच्या विकासाचा करण्यात आलेला आहे.

**शिक्षण :**

महायुती ने जाहीरनाम्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर कला क्रीडा संकुले , डिजिटल शिक्षण सक्षमीकरण कार्यक्रम, महाविद्या नावाची कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण प्रणाली लागू करण्यात येईल, सक्षम अंगणवाड्या, कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श मराठी शाळा उभारण्यात येतील, मुख्यमंत्री श्री योजना , ओबीसी, ईडब्ल्यूएस, एनटी, व्हीजेएनटी यामधील पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल, स्वतंत्र सागर विज्ञान आणि मत्स्यव्यवसाय विद्यापीठांची स्थापना, आय टी आय यांचे आधुनिकीकरण करण्यात येईल इ. मुद्द्यांच्या आधारे महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवण्यात येईल.

महाविकास आघाडी ने आपल्या जाहीरनाम्यामध्ये महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास करण्यासाठी पुढील तरतुदींचा समावेश केलेला आहे. शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल, शिक्षण हक्क कायद्यांतर्गत मोफत शिक्षणासाठीची वयोमर्यादा वाढवण्यात येईल, शाळा महाविद्यालये आणि खाजगी कोचिंग क्लासेसच्या फी नियंत्रित करण्यात येतील, सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी अर्थसंकल्पात शिक्षणासाठी वाढीव तरतूद करण्यात येईल, डिजिटल शाळा ही योजना, जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घेण्यात येईल, प्रत्येक जिल्ह्यात सरकारी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालय उघडण्यात येतील, उच्च शिक्षणासाठी व्याजमुक्त शैक्षणिक कर्ज, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, पार्टी महाज्योती आणि सारथी यांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती निधी वाढविण्यात येईल, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समाज, एमपीएससी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करून 45 दिवसांच्या आत निकाल लावण्यात येतील , प्रत्येक जिल्ह्यात ग्रंथालय आणि प्रत्येक तालुक्यात अभ्यासिका स्थापन करण्यात येईल, मासेमारी आणि सागरी विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यात येईल, कुशल शिक्षक निर्माण करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण विद्यापीठाची स्थापना इ . तरतुदी लागू करण्यात येतील.

**सामाजिक न्याय :**

सामाजिक न्यायाचा मार्ग महाराष्ट्रात अधिक बळकट करण्यासाठी महायुती सरकारने आपल्या जाहीरनाम्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्य धोरण ठरवण्यात येईल, मिस्टर नागरिकांनी मागणी केलेली कागदपत्रे ही त्यांच्या घरी थेट पोचवण्यात येतील , ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बाह्य रुग्ण कक्ष स्थापन करण्यात येतील, वृद्ध पेन्शन योजना, आजी आजोबा पार्क, प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांगांसाठी दिव्यांग कौशल्य भवन, अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीय उद्योजकांच्या व्यवसाय वृद्धीसाठी 15 लाख पर्यंत व्याज रहित कर्ज, भगवान बिरसा मुंडा आदिवासी विद्यापीठ, प्रत्येक जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी संत गाडगेबाबा वस्तीगृहे, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या शहरांमध्ये वस्तीगृहे, सफाई कामगारांसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना, तृतीयपंथीय समुदायांच्या कल्याणासाठी व सन्मानासाठी आवश्यक पावले उचलण्यात येतील इ. बाबींची तरतूद करण्यात आलेली आहे.

महाविकास आघाडी ने आपला जाहीरनामा तयार करताना सामाजिक न्याय यामध्ये पुढील तरतुदी समाविष्ट केलेले आहेत. जातीनिहाय जनगणना, अनुसूचित जाती आणि जमाती विभागांसाठी वाटप केलेले बजेट निर्धारित वेळेत वापरावे यासाठी कायदा करण्यात येईल, सामाजिक गटांच्या महामंडळांसाठी 100 कोटींची विशेष तरतूद, संघटित आणि असंघटित क्षेत्रातील स्वच्छता कामगारांसाठी कल्याणकरी महामंडळ , संजय गांधी निराधार योजनेसाठी उत्पन्न मर्यादा 21 हजारांवरून पन्नास हजार करण्यात येईल, अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीय समुदायातील उद्योजकांना एक कोटी रुपयांचे अनुदान, महिला आदिवासी अल्पसंख्यांक आणि इतर समुदायांसाठी कर्ज सहाय्य देण्यासाठी नाबार्ड सारखी वित्तीय संस्था स्थापन करण्यात येईल, औद्योगिक आणि तंत्रज्ञान या क्षेत्रामध्ये अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीय यांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी सकारात्मक धोरण राबविण्यात येईल, भरोसा सेल, तृतीयपंथीय व्यक्तींसाठी विशेष तरतुदी, भटक्या आणि विमुक्त जमातींच्या समस्या सोडवण्यासाठी बापट आणि रेणके आयोगाच्या शिफारसी लागू करण्यात येतील, वसंतराव नाईक कॉर्पोरेशनच्या माध्यमातून बंजारा समुदायातील सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी दहा लाख रुपयांचे व्याज मुक्त कर्ज देण्यात येईल, दिव्यांग व्यक्तींसाठी अन्न वस्त्र निवारा आणि तंत्रज्ञान यासाठी विशेष योजना इ. तरतुदी राबवण्यात येतील.

**निष्कर्ष :**

दोन्हीही आघाड्यांच्या जाहीरनाम्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, दोन्हीही जाहीरनाम्यामध्ये अनेक साम्य स्थळे पाहायला मिळतात. उदा. कर्जमाफी, रोजगार निर्मिती, महिलांच्या खात्यामध्ये पैसे, MSP इ.विचारधारेंच्या पातळीवर दोन्हीही जाहीरनाम्यानमध्ये काही मूलभूत बाबतीत फरक पाहायला मिळतो जसा की जातवार जनगणना, खाजगीकरणास विरोध, धर्मांतर विरोधी कायदा, सामूहिक हिंसाचार विरोधात कायदा, धार्मिक तेढ निर्माण करणारी विधाने या विरोधात कायदा, LGBTQ, सामाजिक न्याय इ.

दोन्हीही जाहीरनाम्यान मध्ये महत्त्वकांक्षी योजनांची मोठ्या प्रमाणात खैरात केलेली पाहायला मिळते. परंतु त्यासाठीचा लागणार आर्थिक निधी याबाबत कोणतीही ठोस तरतूद पाहायला मिळत नाही. तसेच जीएसटी नंतर तयार होणारी राज्याची आर्थिक परिस्थिती , कर संकलन यामधील फरक, कमी होत जाणारी गुंतवणूक यामुळे तयार होत जाणारी राज्याची आर्थिक परिस्थिती यावर कोणत्याही जाहीरनाम्यामध्ये ठोस असे धोरण पाहायला मिळत नाही.

दोन्ही जाहीरनाम्यानमध्ये कर्जमाफी, रोजगार भत्ता, महिलांसाठीच्या लाडकी बहीण व लक्ष्मी योजना , पेन्शन योजना इ. थेट स्वरूपात पैसे जमा करण्याच्या योजना पाहायला मिळतात. राज्याच्या आर्थिक राजकीय अंगाचा परामर्श दोन्हीही

जाहीरनाम्यांमध्ये पाहायला मिळत नाही. अमर्त्य सेन यांनी सांगितल्याप्रमाणे क्षमतांचा विकास याकडे दोन्हीही जाहीरनाम्यान मध्ये पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही.

जागतिक तापमान वाढ, पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणुका, एमपीएससी चे वार्षिक वेळापत्रक, जिल्हा परिषद शाळांचा विकास इ. मुद्द्यांकडे याकडे महाविकास आघाडीच्या जाहीरनामांमध्ये विशेष लक्ष देण्यात आलेले आहे.

याउलट महायुतीच्या जाहीरनामांमध्ये खाजगीकरण, AI , जलसंधारण व नदी जोड प्रकल्प, प्रक्रिया उद्योगधंदे, धर्मांतर विरोधी कायदा इ. मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आलेला आहे.असंघटित क्षेत्र, शिक्षणातील उदासीनता, शेतीमालाचा भाव , सामाजिक एकोपा, रोजगार निर्मिती, नैसर्गिक आपत्ती , विकासाचे विकेंद्रीकरण , निधी वाटपातील असमानता, राजकारणातील नैतिकता इ. महत्त्वाच्या मुद्द्यांवर दोन्हीही जाहीरनाम्यात विशेष लक्ष दिले पाहिला मिळत नाही.

पक्षाच्या जाहीरनाम्याच्या पुनरावलोकनात असे लक्षात आले की, सर्व जाहीरनाम्यान मध्ये दिलेली बहुतांश आश्वासने ही प्रगतशील सर्व समावेशक आणि व्यापक स्वरूपाची आहेत परंतु महाराष्ट्रातील राजकीय परिघांमध्ये यावर सखोल अशी चर्चा घडवून आलेली दिसत नाही तसेच महाराष्ट्रातील समाजमन एकूणच या जाहीरनाम्यांबाबत उदासीन असल्याचे पाहायला मिळते .

**संदर्भसूची :**


- Ashworth, Rachel E. "Party manifestos and local accountability: A content analysis of local election pledges in Wales." Local Government Studies 26, no. 3 (2000): 11-30.
- Chhibber, Pradeep K., and Rahul Verma. Ideology and identity: The changing party systems of India. Oxford University Press, 2018.
- Dinas, E. & Gemenis, K. (2010). Measuring Parties' Ideological Positions With Manifesto Data: A Critical Evaluation of the Competing Methods. Party Politics.
- Giovanni, Sartori. "Parties and Party Systems: a framework for analysis." Volume I (1976).
- Rudolph, Lloyd I., and Susanne Hoeber Rudolph. In pursuit of Lakshmi: The political economy of the Indian state. University of Chicago Press, 1987.
- Vaishnav, Milan. "The Resilience of Briefcase Politics." (2015).
- https://www.bjp.org/pressreleases/maharashtra-election-manifesto-2024
- https://data.opencity.in/dataset/7d46898c-ec06-488d-aa02-0a9a82a1fcc4/resource/1ce50136-7c16-401b-a37f-83c31ffd53cf/download/mva_manifesto_maharashtra_elections_2024.pdf